सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५४/कोषा प्रशा-४, दि. ०१/०७/२०२५.

**विषय** :- एसएनए स्पर्श (SNA SPARSH) कार्यपध्दतीव्दारे केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी संवितरित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयात परिपूर्ण देयके वेळेवर सादर करणे व अनुषंगिक कामकाज पार पाडणे या संदर्भात सर्वसाधारण सूचना.

*****

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५४/कोषा प्रशा-४, दि. ०१/०७/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०७०११६१०२३११०५ असा आहे.

२. तरी, सदर शासन परिपत्रकानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 02-07-2025 22:35:07

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना / नियोजन व समन्वय / कायदा व सुव्यवस्था / आर्थिक गुन्हे / दहशतवाद विरोधी पथक / विशेष कृती / प्रशासन / वाहतूक / प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन / नागरी हक्क संरक्षण / सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई वगळून).
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.

अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/
नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना / कायदा व सुव्यवस्था / प्रशासन / प्रशिक्षण व खास पथके),
महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्ग सह).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता / धोरण / नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**एसएनए स्पर्श (SNA SPARSH) कार्यपध्दतीद्वारे केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी संवितरित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयात परिपूर्ण देयके वेळेवर सादर करणे व अनुषंगिक कामकाज पार पाडणे या संदर्भात सर्वसाधारण सूचना...**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५४/कोषा प्रशा-४**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक :- १ जुलै, २०२५**

वाचा: वित्त विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५४/कोषा प्रशा-४,दि.२३ एप्रिल, २०२५

**प्रस्तावना:-**

अ) केंद्र पुरस्कृत योजनांच्या अनुषंगाने निधीचे वितरण आणि संवितरण संदर्भात, केंद्र शासन आणि राज्य शासन या दोन्ही स्तरांवरील रोख व्यवस्थापनामध्ये अधिक परिणामकारकता साध्य करण्यासाठी, केंद्र शासनाची सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (PFMS), राज्याची एकात्मिक वित्तीय व्यवस्थापन व माहिती प्रणाली (State IFMIS) आणि भारतीय रिझर्व्ह बँकेची ई-कुबेर (e-Kuber) प्रणाली यांच्या एकात्मिक रचनेच्या माध्यमातून केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी वितरित करण्यासाठी SNA-SPARSH [समयोचित प्रणाली एकीकृत शीघ्र हस्तांतरण (Real Time System of integrated Quick Transfers)] ही पर्यायी निधी प्रवाह कार्यपध्दती भारत सरकारद्वारे अंमलात आणली आहे.

आ) SNA-SPARSH कार्यपध्दतीमध्ये संपूर्ण कामकाज हे संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून पूर्णत: ऑनलाईन पध्दतीने पार पाडले जाणार आहे. केंद्र पुरस्कृत योजनांच्या अंमलबजावणी प्रारुपानुसार निधी संवितरणाच्या प्रक्रियेमध्ये राजस्तरीय एकल मध्यवर्ती अभिकरणे (Single Nodal Agencies) आणि त्यांच्या अधिनस्त असलेल्या कार्यान्वयन यंत्रणा (Implementing Agencies) या राज्यभर विखुरलेल्या कार्यालयांचा अंतर्भाव आहे.

इ) राज्यामधील संबंधीत कार्यान्वयन यंत्रणांनी सादर केलेल्या ईलेक्ट्रॉनिक मागण्या एकत्रित करुन त्या आधारे संबंधीत एकल मध्यवर्ती अभिकरणांना इलेक्ट्रॉनिक देयके तयार करुन ती ऑनलाईन पध्दतीने सादर करणे, सादर केलेली ईलेक्ट्रॉनिक देयके स्विकारणे, त्यावर कोषागार संबंधीत पुढील अनुषंगिक प्रक्रिया पूर्ण करुन, प्रत्येक प्रदान प्रस्तावास प्रथम केंद्र शासनाच्या सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीकडून सहमती घेऊन तदनंतर भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ई-कुबेर

प्रणालीद्वारे आदात्यांना प्रत्यक्ष प्रदान करणे, या बाबींसाठी आवश्यक कोषागार कार्ये पार पाडण्याकरिता महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयाची उपरोक्त ***'वाचा'*** मधील शासन निर्णयान्वये स्थापना करण्यात आली आहे.

ई) केंद्र पुरस्कृत योजनांच्या देयकांवर SNA SPARSH कार्यपध्दती अंतर्गत समयबध्दरित्या कार्यवाही करणे व निधीचे वेळेवर संवितरण सुनिश्चित करणे, याकरिता महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालय, एकल मध्यवर्ती अभिकरण स्तरीय आहरण व संवितरण अधिकारी (SNA DDO), राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (NIC) यांना सर्वसाधारण सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

## परिपत्रक:-

**१. SNA SPARSH कार्यपध्दती अंतर्गत एकल मध्यवर्ती अभिकरण स्तरीय आहरण व संवितरण अधिकारी (SNA DDOs) यांनी करावयाची कार्यवाही:-**

अ) एकल मध्यवर्ती अभिकरण स्तरीय आहरण व संवितरण अधिकारी (SNA DDOs) यांनी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयात ऑनलाईन पध्दतीने देयके सादर करावीत.

आ) सर्व एकल मध्यवर्ती अभिकरणे (SNAs) व त्यांचे आहरण व संवितरण अधिकारी (SNA DDOs) यांनी प्राधान्यक्रम देयके विहित कालमर्यादेत महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयात ऑनलाईन पध्दतीने परिपूर्ण स्वरुपात सादर होतील, याबाबत दक्षता घ्यावी.

**२. महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयाद्वारे करावयाची कार्यवाहीः-**

अ) एकल मध्यवर्ती अभिकरण स्तरीय आहरण व संवितरण अधिकारी (SNA DDOs) यांनी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयास ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या देयकांवर जर कोणतीही अपरिहार्य अडचण उदभवली नाही, तर त्याच दिवशी नियमोचित कार्यवाही करण्यात यावी.

आ) एकल मध्यवर्ती अभिकरण स्तरीय आहरण व संवितरण अधिकारी (SNA DDOs) यांनी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ३.०० नंतर महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयास ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या देयकांवर जर कोणतीही अपरिहार्य अडचण उदभवली नाही, तर पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी नियमोचित कार्यवाही करण्यात यावी.

इ) एकल मध्यवर्ती अभिकरण स्तरीय सर्व आहरण व संवितरण अधिकारी (SNA DDOs) यांनी ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या सर्व परिपूर्ण देयकांच्या संदर्भांत विहित कार्यवाही पूर्ण करुन त्या प्रित्यर्थ प्रदान प्रस्ताव (Payment Files) दररोज भारत सरकारच्या सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (PFMS) कडे पाठविण्यात याव्यात.

ई) भारत सरकारच्या सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (PFMS) कडे पाठवलेले सर्व प्रदान प्रस्ताव (Payment Files) यशस्वीपणे स्वीकारल्या गेले आहेत, याची खात्री करावी.

उ) भारत सरकारच्या सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (PFMS) कडे पाठविण्यात आलेल्या प्रदान प्रस्तावांस (Payment Files) अनुसरून भारत सरकारच्या संबंधित यंत्रणेकडून केंद्र हिस्याची रक्कम प्राप्त होताच, निगडीत राज्य हिस्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी. जेणेकरुन संबंधित आदात्यांना अंतिम प्रदान सत्वर प्राप्त होईल.

**३. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (NIC) यांनी करावयाची कार्यवाहीः-**

अ) SNA SPARSH कार्यपध्दती अंतर्गत एकल मध्यवर्ती अभिकरण स्तरीय सर्व आहरण व संवितरण अधिकारी (SNA DDOs) यांना महाराष्ट्र एकल मध्यवर्ती अभिकरण प्रणाली **(MahaSNAP)** मार्फत देयके तयार आणि सादर करताना कोणतीही तांत्रिक अडचण येणार नाही, हे सुनिश्चित करावे.

आ) महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयास प्राप्त देयकांवर विहित कार्यवाही करणे व भारत सरकारच्या सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (PFMS) कडे प्रदान प्रस्ताव (Payment Files) सादर करणे याबाबतीतील कामांमध्ये कोणत्याही तांत्रिक अडचणी उदभवणार नाहीत, हे सुनिश्चित करावे.

इ) त्याचप्रमाणे आदात्यांना अंतिम प्रदान करताना कोणतीही तांत्रिक अडचण उद्भवणार नाहीत, हे सुनिश्चित करावे.

४. तसेच माहे मार्च अखेरीस महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयाद्वारे देयके स्विकृती व त्याअनुषंगाने संबंधितांनी करावयाच्या कार्यवाहीबाबतच्या सूचना स्वतंत्रपणे यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

५. महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयाचे कामकाज दिनांक १ जुलै, २०२५ पासून सुरू होत असल्याने सदरचे परिपत्रक त्याच दिनांकापासून अंमलात येईल.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०७०११६१०२३११०५ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

RAJENDRA UTTAMRAO GADEKAR

Digitally signed by RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, 2.5.4.20=b8e8c3a034acb70f16af6f81c69ca038ff6f25ff78cfc9e6d815fd95b5367b07, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=37a42e182bace4c129abbeb54e27836d32d401560638f644a547867205474ee5, cn=RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
Date: 2025.07.01 16:11:15 +05'30'

**(डॉ. राजेंद्र सुमन उत्तमराव गाडेकर)**
**उपसचिव, वित्त विभाग**

**प्रति-**

१. SNA SPARSH प्रशासक व SNA SPARSH-DDO
(SNA SPARSH चिन्हांकित केंद्र पुरस्कृत योजना- सर्व)
२. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
४. सायबर कोषागार अधिकारी, मुंबई.
५. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे
६. सहायक संचालक (TreasuryNet), लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**प्रत -**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३. मा.उप मुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव.
४. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास आणि गृहनिर्माण) यांचे सचिव.
५. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
६. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
७. सर्व सन्माननीय विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य.
८. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव.
९. मा. अप्पर मुख्य सचिव (वित्त) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
१०. सर्व अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.
११. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त असलेले सर्व विभाग प्रमुख / प्रादेशिक कार्यालय प्रमुख / कार्यालय प्रमुख.
१२. प्रबंधक, (मूळ शाखा), उच्च न्यायालय, मुंबई.

१३. प्रबंधक, (अपील शाखा) उच्च न्यायालय , मुंबई.
१४. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई.
१५. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
१६. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१७. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१८. आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२.
१९. आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन*, नागपूर ४४४००१.
२०. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
२१. सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई.
२२. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
२३. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई.
२४. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२५. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली.
२६. सर्व विभागीय आयुक्त.
२७. सर्व जिल्हाधिकारी.
२८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२९. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३०. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
३१. निवासी लेखापरिक्षा अधिकारी,मुंबई.
३२. सह संचालक,लेखा व कोषागारे, कोकण / पुणे / नाशिक / छत्रपती संभाजीनगर / अमरावती / नागपूर.
३३. संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई.
३४. सह संचालक,स्थानिक निधी लेखा मुंबई / पुणे /नाशिक / छत्रपती संभाजीनगर / अमरावती / नागपूर.
३५. सर्व वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी,ठाणे / पुणे/ नाशिक / छत्रपती संभाजीनगर / अमरावती / नागपूर.
३६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
३७. वित्त विभागातील सर्व कार्यासने.
३८. निवड नस्ती / कोषा प्रशा -४.